





दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com
•मुख्य संपादक : अजय भांगे •संपादक : रमेश गुळभिले •कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २९ फेब्रुवारी २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक १९७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# गाव-खेड्यातल्या महिला लखपती होणार, मोदींची यवतमाळमध्ये मोठी घोषणा

वादळवार्ता/

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महिला बचत गटाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने यवतमाळच्या दौऱ्यावर आले. त्यांच्या हस्ते आज हजारो कोटींच्या विकासकामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन झालं. यावेळी मोदींनी आपल्या भाषणात महिलांना लखपती करण्याच्या योजनेबाबत भाष्य केलं. "मोदीने गावाच्या बहिणींना लखपती दीदी बनण्याची गॅरंटी दिली आहे. आतापर्यंत देशाच्या 1 कोटी बहिणी लखपती बनल्या आहेत. यावर्षीच्या बजेटमध्ये आम्ही घोषणा केली आहे की, 3 कोटी बहिणींना लखपती बनवायचं आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. "आता संकल्पच्या सिद्धीसाठी मी काम करत आहे. बहिणी आणि मुलींची संख्या 10 कोटींच्या पार गेली आहे. या महिलांना बँकेकडून



8 लाख कोटी रुपये दिले गेले आहेत. 40 हजार कोटी रुपयांचा फंड केंद्र सरकारने दिला आहे. महाराष्ट्रातही बचत गटाशी संबंधित महिलांना याचा फायदा झालाय. आजही 800 कोटींपेक्षा जास्त रुपयांची मदत दिली गेली आहे", अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

"यवतमाळच्या बघिणींनी अनेक ई-रिक्षा देण्यात आलं आहे. मी महाराष्ट्र सरकारचं या कामासाठी विशेष अभिनंदन करतोय. महिला आता ड्रोनही चालवतील. नमो ड्रोन दीदी योजनेच्या माध्यमातून बघिणींच्या समुहांना ड्रोन पायलटची ट्रेनिंग दिली जात आहे. मग सरकार या महिलांना ड्रोन देईल ज्याचा वापर शेतीच्या कामासाठी होईल", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पावर मोदींचं भाष्य

"मोदीने आणखी एक गॅरंटी देशाच्या शेतकऱ्यांना दिली होती. काँग्रेस सरकारने कित्येक दशक देशातील 100 मोठ्या सिंचन योजनांना लटकावून ठेवलं होतं. यापैकी 60 पेक्षा जास्त पूर्ण झाले होते. लटकलेल्या योजनांमध्ये महाराष्ट्राच्या 26 योजना होत्या. महाराष्ट्राच्या जनतेला हे जाणण्याचा अधिकार आहे की, कुणाच्या पापाची शिक्षा तुमच्या पिढ्यांना भोगावं लागलं आहे. या 26 लटकलेल्या योजनांपैकी 12 पूर्ण झाले आहेत. तर इतरांवरही जोरात काम सुरु आहे", अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. "हे भाजपचं सरकार आहे ज्याने 50 वर्षांनी पूर्ण करुन दाखवलं आहे. कृष्ण-कोयना लिफ्ट सिंचन योजना, टेंभू लिफ्ट सिंचन योजना अनेक दशकांनी पूर्ण झालंय. गोसीखुर्द सिंचन योजना आमच्या सरकारनेच पूर्ण केलं आहे. विदर्भ आणि मराठवाड्यासाठी आज पीएम कृषी सिंचन आणि बळीराजा संजीवनी योजने अंतर्गत 51 प्रकल्पांचं लोकार्पण होईल. यातून 80 हजार पेक्षा जास्त हेक्टर जागेला सिंचनाची सुविधा मिळेल", अशी माहिती नरेंद्र मोदी यांनी दिली.

# पंजाबराव शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार ) पक्ष प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
पुणे/पंकज भंडारी

सामाजिक कार्यकर्ते व बांधकाम व्यावसायिक पंजाबराव वसंतराव शिंदे यांनी उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. चांदणी चौक येथील चांदणी लॉन्स या ठिकाणी पक्ष प्रवेश व पदनियुक्तीचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळेस पंजाबराव शिंदे यांच्या सोबत त्यांचे कार्यकर्ते व मित्र परिवार यांनीही पक्ष प्रवेश करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षास जाहीर पाठिंबा दिला. अजितदादा ज्या पद्धतीने महाराष्ट्राच्या विकासासाठी व जनतेच्या कल्याणासाठी कार्य करीत आहेत त्या कार्याने प्रेरित होऊन त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी या पक्षात प्रवेश केला आहे असे मत पंजाबराव शिंदे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी महिला आयोग महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, माजी आमदार रमेश आप्पा थोरात, प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस मितेश नहाटा, वसुंधरा परिवार सोशल फाऊंडेशन अध्यक्षा व राष्ट्रवादी काँग्रेस पुणे शहर संघटिका योगिता गोसावी शिवरकर, संगिता पंजाबराव शिंदे, केसनंद गावचे सामाजिक नेते युवराज शिंदे, शिवाजी शिंदे, पृथ्वीराज शिंदे, रवींद्र दाभाडे, राहुल ठोंबरे, सचिन घोलप, संजीव सबनीस तसेच ग्राहक संरक्षण फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य महासचिव व चित्रपट निर्माते शैलेंद्र निर्मळे इ मान्यवर उपस्थित होते. असंख्य कार्यकर्ते व हजारो जनसमुदाय यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला.




## केज पंचायत समिती येथे एकदिवसीय संवेदीकरण कार्यशाळा

वादळवार्ता/केज

महाराष्ट्र राज्य नियंत्रण संस्था मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड व उपजिल्हा रुग्णालय केज आयोजित पंचायत समिती अधिकारी कर्मचारी यांची सोमवार रोजी एक दिवसीय संवेदीकरण कार्यशाळा सोमवार रोजी घेण्यात आली. कार्यशाळेस प्रमुख उपस्थिती सहायक गटविकास अधिकारी सविता शेप कार्यालयीन अधीक्षक व अधिकारी कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती एकदिवसीय कार्यशाळेत प्रशिक्षण देण्यात आले या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी , उपजिल्हा रुग्णालय केज येथील आय सी टि सी समुपदेशक शोभा साकसमुद्रे , डी एस आर सी विभाग एस आर टि आर मेडिकल कॉलेज अंबाजोगाई समुपदेशक सुनिल गायकवाड यांची एड्स विषयक माहिती दिली. कार्यशाळेच्या सुरुवातीला प्रास्ताविक मध्ये कार्यशाळा घेण्याचा उद्देश आपल्या माध्यामातून ग्रामीण भागा पर्यत पोहचावा व एच आय व्हि बाधित व्यक्ती ना समानतेची वागणूक व कलंक भेदभाव करण्यात येऊ नये. अशी माहिती देण्यात आली.पुढे आय सी टि सी विभाग बद्दल सविस्तर माहिती दिली. यानंतर या कार्यशाळेचे प्रमुख कुलकर्णी यांनी एच आय व्ही चे चार कारणे , गवाक्ष काळ , एड्स , ए आर टि उपचार , २०१७ कायदा ,१०९७ टोल फ्रि क्रमांक सुविधा इ माहिती प्रश्न उत्तराच्या माध्यमातून सखोल मार्गदर्शन केले . एकटे नाही तुम्ही साथिला आहोत आम्ही ही भावना बाधीत व्यक्ती मध्ये वृद्धीगंत करण्याचे आवाहन कार्यशाळेत करण्यात आले .यापुढे गाव पातीळीवरील कार्यशाळा नियोजनासाठी सहकार्य करावे असे मत व्यक्त केले केले . या कार्यशाळे सर्व कर्मचारी अधिकारी यांची उपस्थिती होती .




## मुस्तापूर येथील तरुण शेतकरी महेश भगवान जाधव यांचा ऑईस्टर मशरुम लागवडीचा यशस्वी प्रयोग

दैनिक वादळ वार्ता
नायगांव/हानुमंत चंदनकर

नांदेडच्या नायगांव तालुक्यातील मुस्तापूर येथील तरुण शेतकरी श्री महेश भगवान जाधव यांनी वेगळी शकल लढवून ऑईस्टर मशरूमची लागवड केली कमी खर्चात कमी कालावधीत लागवड व भरघोस उत्पादन घेता येऊ शकते सध्या हॉटेलमध्ये मशरूम पुलाव व भाजीची मोठी मागणी दिसून येते आहे दिवसेंदिवस वाढत असल्येल्या मागणी व कॅन्सर त्वचा रोग चेहरा सौंदर्ययासह अनेक रोगांवर गुणकारी असलेली औषधी भाजी असल्याने महेश भगवान जाधव यांच्या यशस्वी प्रयोगांची चर्चा तालुक्यात सर्वत्र होत आहे महेश जाधव यांनी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले ग्रामीण भागात लागवड व उत्पन्न घेता येऊ शकते परंतु मार्केट मिळण्यासाठी बाजारपेठ चा शोध घ्यावा लागतो असेही ते म्हणाले



# जिल्हा परिषद पालघर मधील शाळांच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांसह दिली इस्त्रोला भेट

## विज्ञानाचा ठेवू ध्यास,राष्ट्राचा करू विकास

दैनिक वादळ वार्ता
पालघर/सौरभ कामडी

भविष्यवेधी शिक्षणाच्या कल्पनेतून जिल्हा परिषद पालघर शिक्षण समिती व शिक्षण विभाग यांच्या संकल्पनेतून पालघर जिल्ह्यातील इन्स्पायर मानक अवॉर्ड,स्पर्धा परीक्षा,राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद,विज्ञान प्रदर्शन इत्यादी क्षेत्रातील आणि उपक्रमशील शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांची व शिक्षकांची निवड शिक्षण विभाग पालघर यांच्यामार्फत करून जिल्ह्यातील आठ तालुक्यातून ३० विद्यार्थी, ८ शिक्षक,२ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी इसरो सेंटर बेंगलोर येथे भेट दिली यावेळी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी शिक्षण समिती सभापती तथा उपाध्यक्ष व सदस्य जिल्हा परिषद पालघर उपस्थित होते,भारताने आतापर्यंत प्रक्षेपित केलेले १३० पेक्षा जास्त कृत्रिम उपग्रह यांच्या प्रतिकृती यांची प्रत्यक्ष माहिती इसरो सेंटर मधील तज्ञ वैज्ञानिकांनी विद्यार्थ्यांना दिली. त्याचबरोबर चांद्रयान ३ निर्मिती प्रक्रिया,चाचणी व प्रक्षेपण यांची प्रतिकृतीसह माहिती दिली, विद्यार्थ्यांनी यासंबंधी आपले प्रश्न, उपग्रह निर्मिती बाबतची कुतुहलात्मक शंका तज्ञ वैज्ञानिकांना विचारले व त्या प्रश्नांची त्यांनी समाधानकार उत्तरे दिली. इस्त्रो बेंगलोर भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना विश्वेश्वरय्या विज्ञान केंद्र,लालबाग बोटॅनिकल गार्डन, इस्कॉन मंदिर,कर्नाटक विधान भवन,बेंगलोर पॅलेस, बोन्साय पार्क इत्यादी शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांनाही भेटी दिल्या. ही सहल दिनांक २४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती . मोखाडा तालुक्यातून जिल्हा परिषद ISO शाळा कोचाळे येथील कू. आश्विनी गोविंद फसाळे इयत्ता ८वी , दुर्गा राजू झुगरे इयत्ता ८वी आणि गणेश हेमंत गांगड इयत्ता ७वी यांची उपक्रमशील शाळेतील गुणवंत विद्यार्थी म्हणून जिल्हास्तरावरून निवडवकरण्यात आली होती . सोबत शाळेचे मुख्याध्यापक दिनकर फसाळे सर होते .



# तीन मिनिटात महाराष्ट्रातील सर्व ब्राह्मण समाज संपवू असे विधान करणाऱ्यावर व दाखवणाऱ्यावर कारवाई करा- सकल ब्राह्मण समाज

वादळवार्ता/केज

दोन दिवसापूर्वी मंगळवारी दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी गावरान तडका या यूट्यूब चैनल वर एक जो स्वतःला लोकप्रतिनिधी सरपंच असं म्हणून घेतो तो सर्वांसमोर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जातीवाचक बोलताना बामणी कावा असं संबोधन करत महाराष्ट्रातील सर्व ब्राह्मण समाज तीन मिनिटात संपवून टाकू असे जाहीर विधान तो करत आहे. त्याच्या अवतीभवती सात ते आठ जण उभे आहेत व ते सर्वजण ब्राह्मण जाती विषयी द्वेष पसरवत आहेत जसे १९४८ साली महाराष्ट्रात ब्राह्मण समाजाचे प्रचंड मोठे हत्याकांड घडवले होते , त्यामध्ये हजारो ब्राह्मणांचे बळी गेले वीस हजाराहून अधिक खरे उद्धस्त केली मालमत्ता लुटल्या संपत्ती लुटली स्त्रियांच्या अब्रू लुटल्या असे कृत्य करण्यास हा सरपंच जो स्वतःला लोकप्रतिनिधी संबोधुन घेत आहे तो महाराष्ट्रातील सर्व विकृत तरुणाईला ब्राह्मणांचे बळी घेण्यास प्रवृत्त करताना दिसून येत आहे. त्याच्या या कृत्यातून महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजावर मोठे संकट ओढावणार आहे व यातून खूप मोठे दुष्कृत्य घडू शकते या अशा विकृत बुद्धीच्या व्यक्तींना तातडीने अटक करून मोठे हत्याकांड करण्याचे उद्देशाने या व्यक्तीने असे विधान केले असल्याचे दिसून येत आहे व त्याच्या भोवती उभारलेले व विधान करताना यूट्यूब चैनल वर बातमी स्वरूपात दाखविली या सर्वांवर गंभीर गुन्हा दाखल करून तातडीने अटक करून त्यांच्यावर कारवाई केली जावी. ही विनंती कायदेशीर पद्धतीने जर त्यांच्यावर कारवाई झाली नाही तर कायदा असं बोलणाराला संरक्षण देतो असं समजून जर पुढे काही दुष्कृत्य घडली तर याला सर्वस्वी जबाबदार कायदा असेल , सरकार असेल व पोलीस प्रशासन असेल याची दखल तातडीने घ्यावी जेवढा उशीर लागेल तेवढे हे प्रकरण गंभीर होईल असे निवेदनात सांगितले आहे. यावेळी धनंजय कुलकर्णी श्रीधर खोत श्रीनिवास केजकर उदय आनंदगावकर शिवराज मुसळे सौरभ विडेकर अनंत कोकीळ व्यंकटेश महाजन चंद्रकांत पाटील श्रीराम शेटे अतुल कुलकर्णी दत्तात्रय तांबेकर कुलदीप आनंदगावकर उपस्थित होते



## संपादकीय

# नागरी संरक्षण संघटनेला पूरक होमगार्ड संघटना!

[आंतरराष्ट्रीय नागरी संरक्षण दिन विशेष.]

जागतिक नागरी संरक्षण दिन दरवर्षी १ मार्च रोजी साजरा केला जातो. जगातील नागरी संरक्षण, नागरी संरक्षण, नागरी सुरक्षेबाबत लोकांना जागरुक करणे हा त्याचा उद्देश आहे. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर सिव्हिल डिफेन्स (आईसीडीओ) ही एक आंतरशासकीय संस्था आहे ज्याचा उद्देश नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या प्रसंगी लोकसंख्येचे संरक्षण करणे आणि त्यांना मदत करणे आणि मालमत्ता आणि पर्यावरणाचे संरक्षण सुनिश्चित करणाऱ्या संरचनेच्या राज्यांद्वारे विकासात योगदान देणे आहे. तसेच या दिवशी विविध राष्ट्रीय कार्यक्रम या दिवशी आयोजित केले जातात. अशी रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखातून जाणून घेउया... संपादक.

देशातील नागरिकांचे जीवित, मालमत्ता तसेच नागरी संस्था, उद्योगधंदे, वसाहती इत्यादींचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांच्या स्वयंस्फूर्त सहभागाने व शासकीय साहाय्याने उभारलेली व्यवस्था म्हणजे नागरी संरक्षणव्यवस्था होय. १ मार्च हा जगभरात जागतिक नागरी संरक्षण दिन म्हणून पाळण्यात येतो. शत्रूच्या सैनिकी, घातपाती, प्रचारकी वा तत्सम स्वरूपाच्या आक्रमक आणि विध्वंसक कृत्यांनी देशातील नागरी जीवनाची हानी होऊ शकते. त्याचप्रमाणे राष्ट्रांतर्गत घातपाती कारवायांमुळेही देशातील कायदा व सुव्यवस्था बिघडून नागरी जीवन विस्कळित होऊ शकते. म्हणून आधुनिक काळात नागरी संरक्षण हे राष्ट्राच्या एकूण संरक्षणनीतीचाच एक अविभाज्य असा घटक मानला जातो. नागरी संरक्षणाची पारंपरिक कल्पना ही केवळ प्रतिबंधक उपायांपुरतीच मर्यादित असल्याचे दिसते, तर शत्रूचे आक्रमण आणि विध्वंसक कारवाया यांपासून नागरिकांना झळ पोचू नये या हेतूने प्रतिकारात्मक व प्रतिबंधक अशी दुहेरी व्यवस्था आधुनिक काळात केली जाते. गावाला तटबंदी घालणे हा नागरी संरक्षणाचा एक जुना प्रकार होय. आधुनिक काळात आक्रमणाचे, युद्धाचे आणि देशांतर्गत संघर्षाचे स्वरूप आमूलाग्र बदल्यामुळे नागरी संरक्षणाच्या कल्पनेतही बदल झालेला आहे.

नागरी म्हणजे बिनलष्करी लोकांचे संरक्षण, ही कल्पना आधुनिक काळातील नसून तिचे मूळ प्राचीन काळात सापडते. गावाला तटबंदी घालणे हा प्राचीन काळी सर्वत्र आढळणारा प्रकार नागरी संरक्षणाचाच एक भाग होता. हिंदुस्थानात तथाकथित उच्चवर्णीय लोकांनाच तटबंदीयुक्त नगराच्या आत वस्ती करता येत असे. संकटकाळी मात्र याच तटांच्या आत सर्वांना आश्रय मिळे. अठराव्या शतकापासून युद्धाचे स्वरूप बदलत गेले. ते केवळ रणांगणापुरतेच मर्यादित न राहता नागरी वस्तीपर्यंत फैलावले. नागरिकांवर सतत हल्ले केले, तर नागरिक शेवटी कंटाळून आपल्या राजकर्त्यास शरणागती पत्करण्यास भाग पाडतील, अशी विचारसरणी प्रभावी ठरली. नागरी संरक्षणाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने ही संघटना उभारली आहे. नागरी संरक्षणाच्या योजना, उपाय व साधने यांसाठी मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्रालय जबाबदार असून त्यासाठी केंद्रात नागरी संरक्षण प्रसंचालक व त्याचे कार्यालय आहे. प्रसंचालक लेफ्टनंट जनरल या श्रेणीचा सैनिकी अधिकारी असतो. राज्यपातळीवरही नागरी संरक्षण संघटना असून त्यांची संचालयीन कार्यालये असतात. संरक्षण, टपाल व तार, रेल्वे, नागरी व औद्योगिक संस्था यांचे प्रतिनिधी असलेल्या नागरी संरक्षण समित्या प्रत्येक राज्य व जिल्हापातळीवर नेमलेल्या असतात. तसेच मोठ्या शहरात व गावात नागरी संरक्षण दले उभारण्यात आली असून त्यांत कोणाही नागरिकास स्वयंसेवक म्हणून भरती होता येते.

गावाचे पेठावार भाग पाडून त्यांत ठिकठिकाणी वॉर्डन पोस्ट व प्रथमोपचार केंद्रे असतात. स्वयंसेवकांना गस्त घालणे, प्रथमोपचार करणे, आग विझविणे, संकटग्रस्तांची सुटका करणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे इ. गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाते. मध्यवर्ती सरकारने नागपूर येथे राष्ट्रीय नागरी संरक्षण महाविद्यालय स्थापन केले आहे. तेथे नागरी संरक्षणाचे उच्च शिक्षण दिले जाते. राष्ट्रीय अग्निशामक सेना महाविद्यालयात अग्निशामक सेवेचे उच्च शिक्षण देण्यात येते. १९७३ अखेर एकूण ४ लक्ष ४ हजार स्वयंसेवक नागरी संरक्षण दलात होते. मध्यवर्ती सरकाराकडून सन १९७३ अखेर २९ लक्ष रुपयांचे अनुदान राज्यांना मिळाले. नागरी संरक्षण संघटनेला पूरक अशी होमगार्ड संघटना प्रत्येक राज्यात काम करते. !! विश्व नागरी संरक्षण दिनाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**-संकलन व सुलेखन-**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# महिलांचे पाऊल पडती पुढे...




८ मार्च महिला दिन निमित्त २१ व्या शतकात आपल्या देशाने विविध क्षेत्रात गौरवास्पद प्रगती केल्याबद्दल सर्वत्र मोठ्या दिमाखात नगारे वाजविले जात आहे. प्रगतीच्या या गुणपत्रात महिला वर्गाचा देखील वाटा मोठा आहे हे विसरुनही चालणार नाही. आज वैमानिकसह मेट्रो चालक, ट्रक चालक, रिक्षा चालक, बस वाहक अशा किती भूमिका घर संसारासह त्या बजावताना दिसत आहे. काही दिवसानंतर महिला वाहकांच्या सोबतीला महिला चालकही एस टी बसमध्ये दिसतील. याबाबत शकांच नाही. असे असले तरीही आज महिला वर्गांवर होणाऱ्या अत्याचाराच्या 'राम कहान्या' संपल्या नाहीत. पूर्वापार महिलांवर अत्याचार होत आहे. अत्याचार करणाऱ्यांमध्ये पुरुष असला तरी महिलांचे प्रमाण सुध्दा कमी नाही हे देखील विसरुन चालणार नाही.

एक महिला [ सासू ] दुसऱ्या महिलेची [ सुनेची ] व्यथा समजू शकत नसेल, सरस्वती मुंडे सारख्या डॉक्टर महिला शेकडो महिलांचे गर्भपात करुन त्या गर्भाची निघृणपणे विल्हेवाट लावत असेल, एक माता आपल्याच पोटातील अर्भक रेल्वे रुळांवर, कच-याच्या ढिगा-यावर किंवा नाले, गटारांत बेवारसपणे फेकून देत असेल तर मग पुरुषांकडे बोट का दाखविले जाते? महिलांनी महिलांच्या समस्या समजून घेण्यासाठी एकमेकींचे उणे-दूणे बाजूला सारुन, चुगली करणे बंद करुन एका नव्या पर्वाच्या दिशेने 'महिलांचे पाऊल पडती पुढे....!' ची संकल्पना प्रत्यक्षात साकार करणे महत्वाचे ठरेल.

'नेमेची येतो मग पावसाळा' या न्यायाने प्रत्येक वर्ष कोणत्या ना कोणत्या कारणासाठी साजरे होत असते. बालकवर्ष तर कधी महिला वर्ष म्हणून ते खास साजरे केले जाते. असेच मार्च २००१ ते २४ मार्च २००२ हे नव्या शतकातील पहिले वर्ष ' महिला सशक्तीकरण वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले. पुरातन काळापासून महिला ही दासी आहे. याला कुठेतरी छेद देण्याचे काम महात्मा फुले, राजा राममोहन रॉंय यांनी केले. त्यानंतर काही समाजसुधारकांनी स्त्रीला पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळाले पाहिजेत. या दृष्टीने समाजात महिला जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

डोक्यावर उन्हाच्या झळा
कडेवर पोटाचा गोळा
अनवाणी पायाने ओढतात
महिला संसाराचा गाडा....

अशी महिलांची काहीशी अगतिक स्थिती पाहिली की मन सुन्न होते. आजच्या काळात स्त्री देहाच्या पावित्र्याविषयी समाजात विविध कल्पना आहेत. बलात्कारासारख्या घटना सतत घडत असतात. त्यात पतिता ठरते ती स्त्री. तिला सन्मानाने स्विकारले जात नाही. तिच्यावर दिवसाढवळ्या होणारा बलात्कार, तिचा शीलभंग करणाऱ्या पुरुषास समाजात सन्मानाचे स्थान असते. आज स्त्री देहाच्या पावित्र्याभोवती समाज रक्षणार्थ उभा आहे का? आजही काही ठिकाणी तिला जीवंत जाळले जाते. विश्वशांतीच्या स्थापनेला व अहिंसेच्या प्रतिष्ठेला नारी शक्तीची आवश्यकता आहे. कारण स्त्री ही जन्मदात्री आहे. त्यामुळे मनुष्य जीवनाचे मूल्य ती अधिक समजू शकते. पुढच्या पिढीला ती घडविणार आहे. तेव्हा अहिंसक समाजाच्या स्थापनेत तिचा वाटा मोठा आहे. पूर्वीसारखी आज समाजात हुंडा प्रथा राहिलेली नाही हे विशेष महत्वाचे. त्याचे कारणही सांगण्यासारखे आहे. तीस पस्तीस वर्षांपूर्वी समाजात असलेल्या हुंडा प्रथेने हाहाक्कार माजला होता. हुंडा ही प्रथा मुलींच्या परिवारासाठी फार घातक ठरणारी होती. या हुंडा प्रथेमुळे हजारों मुलींच्या आई वडिलांना सोने विकून तसेच अक्षरशः शेती विकून मुलींच्या लग्नात हुंडा द्यावा लागत असे. आई वडिलांच्या सुखी-आनंदी जीवन जगण्याच्या ऐन उमेदीच्या काळात या हुंड्यापायी दुःखी जीवन त्यांना जगावे लागत असे. कर्जबाजारी व्हावे लागत असे. यात सावकारांची मात्र दिवाळीच साजरी होत असे. त्यावेळी एखाद्या सूज्ञ तरुणीने हुंडा प्रथेला विरोध केला तर समाजात तिच्याविषयी शंका निर्माण केली जात असे. एखाद्या युवकानेच हुंडा घेण्यास नकार दिला असेल तर काहीतरी खोट-दोष असावा. असाही प्रश्न उपस्थित केला जात असे.

कालांतराने 'मुलगीच नको' अशा प्रकारची मानसिकता समाजात निर्माण झाल्याने स्त्रीच्या पोटात असलेले बाळ हे मुलीचे आहे कि मुलाचे? हे तपासण्यासाठी डॉक्टरांकडे जाऊन सोनोग्राफीच्या माध्यमाचा वापर करुन मुलीचा अर्भक असेल तर ते काढून टाकले जाई. मारुन टाकले जाई. हे केवळ हुंडा प्रथेमुळे. अशा प्रकारे त्याकाळात लाखों मुलींना जन्म देण्यापूर्वीच मारले गेले अन् त्यामुळे परिणाम असा झाला की मुलांची संख्या अधिक तर मुलींची संख्या त्यातुलनेने फार कमी. असा असमतोल समाजात निर्माण झाला. त्यामुळे गेल्या पंधरा वर्षांपासून जन्मासाठी मुलांना लग्नासाठी मुली मिळणे ही फार चिंतेची बाब ठरत आहे. अशा या कारणांमुळे हुंडा ही प्रथा आज म्हणावी तशी राहिलेली नाही. सुशिक्षित, उच्चशिक्षित, चांगली नोकरी असणाऱ्या फार कमी मुलांच्या लग्नासाठी आज हुंड्याची मागणी केली जाते. त्यातही आज समाज सुशिक्षित समजूतदार झाल्याने देखील हुंड्याची मागणी केली जात नाही.

आज मुलींच्या अपेक्षा देखील वाढल्या आहेत. त्यांनाही आपले हक्क समजायला लागले असून आपल्या पसंतीस योग्य असणाऱ्या मुलासोबत त्या विवाह करु लागल्या आहेत. आज हजारों तरुण असे सुध्दा आहेत कि चाळीशी पन्नाशी पार करुन ते अविवाहितच आहेत. कमी पगाराची नोकरी असणाऱ्यांना देखील विवाहासाठी मुलगी मिळणे फार कठीण झाले आहे तर शेतकरी, शेतमजूर असणाऱ्या मुलांना विवाहासाठी कोणी मुलगी दाखवायला देखील तयार नाही. 'नोकरी नाही तर छोकरी नाही' ही वास्तवता आज समाजात आहे.

आजही ब-याच ठिकाणी जे काम पुरुष करतो, तेच काम जर महिला करीत असेल तर पुरुषाला जास्त तर महिलांना कमी मजूरी दिली जाते. मग कुठे आहे आमची स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य? शिक्षणाच्याबाबतीत म्हणायचे झाले तर दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेत पास होण्याचे मुलींचेच प्रमाण अधिक असते.

वंशाला दिवा हवा म्हणून साधू, धांगे, गंडे, दोरे, सोनोग्राफी, भोंदू महाराज यांसारखे अनेक प्रयोग केले जातात. मुलगी झाली आजही काही सासूच्या कपाळावर घड्या पडतात, सुनेला दोष दिला जातो. अर्थात ती सासु देखील एक स्त्रीच असते ना...! मुलगा झाला तर थाटामाटात पेढे वाटले जातात. विविध कार्यक्रमांचे त्यानिमित्ताने आयोजन केले जाते. हाच वंशाचा दिवा कालांतराने याच आई वडिलांना मारहाण करतो, आश्रमात पाठवतो, मग तेव्हा काय...? 'याच साठी का केला होता अट्टाहास?' आजही बरेच डॉक्टर मुलीचा जन्म झाला असेल तर कसलीच फी घेत नाहीत. शासनाने देखील मुलींसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत.

सासु-सुनेतील वाद, मनोमन वैमनस्य म्हणजे न सोडविता येणारं कोडं, आजच्या सुशिक्षित समाजात देखील हा वाद म्हणावा तसा संपलेला नाही. मुंबईतील लोकल रेल्वेत महिलांच्या डब्यातील प्रवास पाहिल्यास तो प्रवासातील प्रसंग फारच करुणादायक असतो. एखादी गर्भवती अथवा वृध्द महिला गर्दीत चढत असेल तर काही महिला त्यांना सहानुभूती वा सहकार्य करताना जाणवत नाही. परंतु जर पुरुषांच्या लोकल डब्यातून महिला प्रवास करीत असेल तर महिलेला सन्मानाची वागणूक दिली जाते. आसनावर बसलेला पुरुष उठून महिलेला बसायला जागा देतात. उतरतांना देखील आदरपूर्वक उतरविले जाते.

स्वतःच्या पोटाचा गोळा रेल्वे, गटार, कचरा यासारख्या ठिकाणी बेवारसपणे ठेवून जाणे अथवा फेकून देण्याचे कृत्य कोण करीत असते? शासनाने व कायद्याने महिलांना अनेक प्रकारे संरक्षण दिले आहे. पोलीस स्टेशनमध्ये देखील महिलांना तक्रारीसाठी पुरुष पिडित महिला तक्रार निवारण कक्ष आहे. पुरुषांसाठी मात्र पत्नी-महिला पिडित निवारण कक्ष नाही. काही महिला या सहानुभूतीचा व कायद्याचा गैरवापर करुन अनेक पुरुषांच्या विरुध्द मारहाण करणे, हुंडा मागणी करणे, स्वतः स्वतःचे कपडे फाडून पुरुषांवर दोषारोपण करणे यासारख्या खोट्या तक्रारी करुन गंडविण्याचे काम केले जात आहे. यामुळे अनेक निरपराध पुरुषांचे आयुष्य नहाक उध्वस्त झाले आहे व होत आहे. आजही पोलीस स्टेशन असो वा न्यायालय येथे स्त्रीकडे सहानुभूतीन तर संबंधित पुरुषाकडे अपराधीच्या नजरेने पाहिले जाते. रुग्णालयातून बाळ चोरी करण्याच्या कृत्यांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक असल्याचेही जाणवते. गर्भलिंग परिक्षणाला कायद्याने बंदी असताना देखील काही वर्षांपूर्वी बीड येथील महिला डॉक्टर सरस्वती मुंडे या महिला असून त्यांनी कित्येक महिलांचे गर्भपात करुन त्या गर्भाची अतिशय निघृणपणे विल्हेवाट करीत होत्या. सदर घटना हृदय हेलवणारीच होती. अर्थात सदर महिलेला कायद्याने शिक्षा देखील केली. अशा प्रकारचे कृत्ये महिलांकडूनच होत असतील तर पुरुष वर्गाला दोष देऊन त्यांच्या विरुध्द नारी शक्तीचा आवाज उठविणा-यांनी प्रथम वर उल्लेखलेल्या घटनांचा सारासार विचार करुन समाजातील ही 'कीड' समूळ नष्ट करण्यासाठी आवाज उठविणे गरजेचे आहे.

काळानुसार बदल करणे जरी आवश्यक असले तरी आपल्या भारतीय संस्कृतीला पायदळी तुडवत पाश्चिमात्य संस्कृतीचे गुण-गाण करणे, त्यांच्या पावलांवर पाऊल टाकणे कितपत योग्य आहे? महिलांनी महिलांकडून आदर्श निर्माण करणे गरजेचे आहे. त्याचे उदाहरण म्हणजे माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सोनीया गांधी, निलम गो-हे, सुप्रिया सुळे, माधुरी दिक्षित, सिंधूताई, हेमा मालिनी, जयाप्रदा, किरण खेरे अशा हजारों महिलांचे पेहराव आणि कार्य वाखाणण्यासारखे आहे. आधुनिकतेचा झेंडा मिरवणा-यांनी सदर महिलांकडून चांगले धडे गिरवावेत.

आजही नेमून दिलेली कामे प्रामाणिकपणे करण्याची स्त्रियांची धडपड दिसून येते. असे नसते तर भारतीय संसदेच्या प्रवेशद्वारावर अनेक सुरक्षारक्षक तैनात असताना एकट्या कमलेश कुमारीने आपल्या जीवाची पर्वा न करता संशयीत वाहनाला हटकले व संसदेतील अतिमहत्वाच्या तसेच इतर व्यक्तींचे प्राण वाचविले. सरोजीना नायडू यांनी म्हाटले आहे की, जोपर्यंत स्त्रिया राजकारणात समर्थपणे भाग घेणार नाहीत तोपर्यंत देशाचा ख-या अर्थाने विकास होणे शक्य नाही. आज अपेक्षेनुसार महिला राजकारणात सक्रिया झाल्या आहेत. देश प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. महात्मा गांधीजींनी म्हटले आहे कि 'एक माता ही शंभर शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ आहे' राष्ट्रपती, खासदारपासून ग्रामपंचायत सदस्यांपर्यंतच्या विविध क्षेत्रात विविध पदांवर त्या निवडून येत आहेत. काही महिलांची कामगिरी खरोखर वाखाणण्यासारखी आहे. असे असले तरी काही ठिकाणी कठपूतली म्हणून तिचा वापर केला जात आहे. तिच्या कुटुंबातील लोकच तिच्या पदाबाबत व त्यासंबंधित कामांबाबत निर्णय घेताना जाणवतात.

तिचा सन्मान करुन तिला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे. समाजासह राष्ट्राच्या उन्नतीसाठी महिलांचे योगदान महत्वाचे ठरणार आहे. हे विसरुन चालणार नाही.

**राजेंद्र चौधरी. बोरीवली**
**मो,९४२३४७२७६५**

# आर के एफ जे एन पी विद्यालयाचे निरोप समारंभ उत्साहात संपन्न.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

रुस्तमजी केरावाला फाउंडेशन जेएनपी विद्यालयात १० वीच्या मुलाच्या साठी निरोप समारंभ(आशीर्वाद दिवस ) साजरा झाला. या कार्यक्रम साठी प्रमुख पाहुणे म्हणून चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड चे संस्थापक, आध्यक्ष तसेच पीटीए उपाध्यक्ष जेएनपी विद्यालय विकास कडू, विशाल पाटील, पालक प्रतिनिधी दर्शना कासुकर, पालक प्रतिनिधी अनिल ठाकूर आणी आरकेएफ प्रशासन कडून आरकेएफ जेएनपी विद्यालयाचे ऍडमिन विशाल माने सर, सुजा मॅडम,माध्यमिक विभाग मुखध्यापक गिरीश पाटील सर,प्राथमिक विभाग चे मुख्यध्यापक रमाकांत गावंड , उपमुख्याध्यापक जगदीश मढवी , सुपरवायझर टेमकर मॅडम,शशिकांत म्हात्रे सर, सना मॅडम,वर्षा म्हात्रे मॅडम, अमिता मॅडम, प्रिया पाटील मॅडम,जोगळे सर, रहीम सर दर्शना मॅडम, तेजश्विनी मॅडम, भूषण सर, टेमकर सर, के के सर हे उपस्थित होते.सदर पाहुण्यांचे स्वागत आरकेएफ जेएनपी विद्यालय चे मुख्याध्यापक गिरीश पाटील सर यांनी केले कार्यक्रम प्रसंगी सर्व मुलांचे स्वागत पालक प्रतिनिधी कडून पेन व गुलाब देऊन केले या वेळी शाळेकडून मुलांवर पुष्पवृष्टी करण्यात आली काही निवडक विद्यार्थ्यांनी आपले भाषण केले. मनोरंजन साठी विद्यार्थ्यांकडून शाळेला निरोप म्हणून विडिओ प्रेझेंटेशन केले नंतर काही नृत्य व नाटिका ही सादर केले. आपले मनोगत व्यक्त करताना विकास कडू म्हणाले की या शाळेने आज पर्यंत अनेक विद्यार्थ्यांना उच्च पदावर नेले आहे त्यांनी आपल्या आई वडिलांचे नव्हे तर संपूर्ण उरण, रायगड चे नाव उंचावले आहे. या शाळेत शिक्षकांबद्दल बोलायचे झाले तर मढवी सर , वर्षा मॅडम, टेमकर टीचर, टेमकर सर, मंजुळा मॅडम, भूषण सर यांचे मी खास कौतुक केले पाहिजे. कारण मी या शाळेच्या पालकांचे प्रतिनिधित्व करत आहे त्यामुळे माझ्या सोबत अनेक पालकांचे, मुलांचे संभाषण होते ते नेहमी या शिक्षकांबद्दल गोडवे गात असतात त्यांची शिकवण्याची पद्धत अदभूत आहे. शेवटी विकास कडू यांनी शाळेतील कर्मचारी दादा, आणी मावशी याचे ही कौतुक केले.व सर्व मुलांना परीक्षा साठी शुभेच्छा व आशीर्वाद दिला.तसेच विशाल पाटील यांनी आपले मनोगत मांडताना मुलांना सांगितले की तुमचे वडील आपल्या पोटाला चिमटा काढून तुमच्या शिक्षणाचा खर्च पुरवत आहे, म्हणून आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करा.एवढे बोलून मुलांना शुभेच्छा दिल्या. माने सर, सुजा मॅडम, गावंड सर, गिरीश पाटील सर, टेमकर मॅडम यांनी आपल्या खास शैलित मनोगत मांडले.या कार्यक्रम दरम्यान शाळेकडून मुलांना खाऊ व शालेय साहित्य देण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र ठाकूर यांनी केले तर आभार प्रदशन गिरीश पाटील यांनी केले.



# ज्युनिअर सायंटिस्ट १२ वर्षीय आदित्य बडे ने शोधला अंतराळात लघुग्रह



## जागतिक स्तरावर संशोधन, अभ्यास सुरु

वादळवार्ता/शिरूरकासार

शिरुर कासार तालुक्यातील वारणी येथील रहिवासी तथा आयडियल इंग्लिश मेडियम स्कुलच्या बारा वर्षीय आदित्य बडे या छोट्या शास्त्रज्ञाने अंतराळात लघूग्रह शोधला असुन या लघूग्रहाचा जागतीक स्तरावर संशोधन अभ्यास सुरू झाला असुन आदित्यचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे . आदित्य बडे या विद्यार्थ्याने इस्त्रो मॅजिका या अंतरराष्ट्रीय अंतराळ शैक्षणीक संस्थेच्या मार्गदर्शनाखाली अंतराळातील लघूग्रह शोधला, नासा पार्टनर असलेल्या खगोल शास्त्र शोध मोहिमेत लघुग्रह निरिक्षणात उल्लेखनिय कामगिरी केली . पृथ्विच्या जवळच्या व मुख्य बेल्टमधील लघुग्रह बडेने शोधला असुन त्यास नासा पार्टनर असलेल्या आय एएससी ने प्राथमिक दर्जा दिला आहे ,या लघुग्रहाचे जागतीक स्तरावर संशोधन व अभ्यास केला जाणार आहे . इस्रो मॅजीका या नोदणीकृत स्पेस ट्यूटर संस्थेच्या पहिल्या सुपर एक हजार ज्युनिअर सायंटिस्ट प्रशिक्षणात देखील आदित्यची निवड झाली आहे. प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत येणा-या लघुग्रह शोध मोहीम कार्यक्रमात संशोधन केले आहे. इस्त्रो मॅजिका ही पृथ्वीवरील खगोलशास्त्रीय शोध घेणारी आणि अवकाश विज्ञान व तंत्रज्ञान मधे विशेष काम करणारी मान्यता प्राप्त अंतरराष्ट्रीय शैक्षणीक संस्था आहे . जवळपास ८० देशात ही संस्था विज्ञान तंत्रज्ञान गणित व अभियांत्रिकी यावर प्रमाणीत करण्यात आली असुन या संस्थेमधे शिरूरकासारचा आदित्य बडे प्रशिक्षण घेत आहे. सध्या तो आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरूर कासार येथे इयत्ता सहावी मधे शिक्षण घेत आहे . एव्हड्या छोट्याशा वयात एव्हडी मोठी प्रगल्भता ही शिरूर कासारसाठी स्वाभिमानाची गोष्ट असल्याने आदित्य बडे चे या कौतूकास्पद कामगिरी बद्दल विद्यावर्धिनी क्लासेसमध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित क्लासेसचे संचालक बडे, श्रीमती शारदा बडे, पालक वर्ग व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. उपस्थित शिक्षक व शिक्षक प्रेमीकडून कौतुकाचा वर्षाव केला जात असून आदित्यला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पशुवैद्यकीय दवाखाना असुन अडचण नसुन खोळंबा

## डॉक्टरच्या दुर्लक्षामुळे नवगण राजुरीत शेतकऱ्याची ७० हजाराची गाय दगावली

**वादळवार्ता/बीड**

या वर्षी पाऊस कमी झाल्याने आत्तापासूनच उन्हाची तिव्रता वाढू लागली आहे. या उन्हामुळेच मंगळवार दि.२७ रोजी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या दुर्लक्षामुळे नवगण राजुरीत शेतकऱ्याची ७० हजाराची गाय तापेने दगावल्याने शेतकऱ्याच्या संकटात भर पडली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी पाऊस अल्प झाल्याने शेतकऱ्याच्या पिकावर याचा परिणाम झाला असुन शेतीच्या उत्पन्नात घट झाली आहे. पाणी टंचाई आणि चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाल्याने दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या पशु धनात घट होत आहे. चारा आणि पाण्याच्या प्रश्नामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपली जनावरे बेभाव विक्री केली. काही शेतकऱ्यांकडे आहेत ते उन्हाचे वाढते तापमानामुळे दगू लागली आहेत. नवगण राजुरी येथील शिवाजी बहीर या शेतकऱ्याची गेल्या वर्षभरात तीन वासरे आणि आता तर दुसी ७० हजाराची संकरीत गाय दगावल्याने निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यावर पुन्हा संकट उभे राहिले आहे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या



हलगर्जीपणामुळे आत्तापर्यंत नवगण राजुरी सर्कल मधील शेकडो जनावरे आजाराने दगावली आहेत. नवगण दोन ठिकाणी राजुरी येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ असुन येथे गेल्या आठ महिन्यांपासून नावालाच वैद्यकीय अधिकारी आला आहे. सदर अधिकाऱ्याची गेल्या जुनमध्ये शिरूर कासार येथुन नवगण राजुरी येथे बदली झाली. परंतू शिरूर कासार येथे दुसरा वैद्यकीय अधिकारी रुजू न झाल्याने नवगण राजुरी येथील वैद्यकीय अधिकारी शिरूर कासार आणि नवगण राजुरी अशा कामकाज पाहत असल्याने सदर अधिकाऱ्याचे नवगण राजुरी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात लक्ष नसल्याने येथील कारभार उर्वरित कर्मचारीच पाहत आहेत. या दवाखान्याची अवस्था असुन अडचण नसुन खोळंबा अशी झाली आहे. या दवाखान्याअंतर्गत नवगण राजुरी, लिंबा, रूई, मुर्शदपुर, तिप्पटवाडी, वंजारवाडी, काटवटवाडी, बेलूरा, केतुरा, रूद्रापुर अशी १० गावे असुन येथील शेतकऱ्याच्या जनावरांचा उपचार शिपाई, लिपीक असे कर्मचारीच करीत असल्याने याचा फटका बळीराजाच्या पशुंना होत आहे. तरी पशुधन विकास अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देवून एका वैद्यकीय दवाखान्याला एक अधिकारी द्यावा, एका अधिकाऱ्यावर दोन्ही दवाखान्याचा कारभार सोपवू नये अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचा दि.२ ते ९ मार्च दरम्यान महाशिवरात्री अखंड हरिनाम सप्ताह महोत्सव

## सप्ताह सोहळ्याचा भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा-महंत महादेवानंद भारती महाराज

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री. क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर देवस्थान येथे महंत महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प्रति वर्षाप्रमाणे दि.२ ते ९ मार्च २०२४ दरम्यान महाशिवरात्री प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह व श्री.संत तुकाराम महाराज गाथा पारायण व अखंड विनावादन सप्ताह सोहळ्याचे आयोजन केले असून या सप्ताह सोहळ्यात पहाटे ४ ते ६ काकडा आरती,६ ते ७ श्रीस अभिषेक,७ ते ८ विष्णुसहस्रनाम स्तोत्र हनुमान चालीसा, ८ ते १२ श्री.संत तुकाराम महाराज गाथा पारायण,दुपारी ३ ते ५ प्रवचन,५ ते ६ हरिपाठ,रात्री ९ ते ११ हरिकिर्तन,११ ते ४ हरीजागर, संगीतभजन,भारुड असे दैनंदिन कार्यक्रम होणार असून या धार्मिक सोहळ्याचे पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा.असे आवाहन मठाधिपती श्री.ह.भ.प.गुरुवर्य महंत श्री श्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज व ह.भ.प.परमानंद भारती महाराज यांनी केले आहे. या कार्यक्रमात दि.२ मार्च शनिवार रोजी ह.भ.प.नारायण महाराज बजगुडे (अश्वत्थलिंग संस्थान) यांचे प्रवचन व ह.भ.प. शिवानंद भारती महाराज (दत्त संस्थान तांबराजुरी) यांचे किर्तन,दि.३ मार्च रविवार रोजी ह.भ.प.सखाराम महाराज ढास (मुळूक)यांचे प्रवचन तसेच ह.भ.प.प्रेमानंद भारती (गुरु महादेवानंद भारती महाराज) किर्तन,दि.४ मार्च सोमवार रोजी ह.भ.प.महादेव साबळे सर यांचे प्रवचन तसेच ह.भ.प.परमानंद भारती(गुरु महादेवानंद भारती महाराज)यांचे किर्तन, दि.५ मार्च मंगळवार रोजी ह.भ.प.शिवानंद भारती महाराज (दत्त संस्थान तांबा राजुरी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.रामनाथ महाराज केदार



शास्त्री(पावन गणपती संस्थान थाटे) यांचे किर्तन,दि.६ मार्च बुधवार रोजी ह.भ.प.अनंत मुळे (लिंबागणेश) यांचे प्रवचन तर ह.भ.प.मारुती महाराज झिरपे (चापडगाव)यांचे किर्तन,दि.७ मार्च गुरुवार रोजी भागवत कापसे सर(चंद्रेवाडी)यांचे प्रवचन तर ह.भ.प.विठ्ठल महाराज चणघटे शास्त्री(पैठण)यांचे किर्तन,दि.८ मार्च शुक्रवारी रोजी ह.भ.प.म्हस्कर महाराज (वाघाचा वाडा) यांचे प्रवचन तर ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी यांचे किर्तन आयोजित केले आहेत.

### सांगता सोहळ्याला मनोज जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती

शनिवार दि.९ मार्च २०२४ रोजी सप्ताह सोहळ्याची सांगता होत असून यावेळी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होऊन नंतर मठाधिपती ह.भ.प.गुरुवर्य महंत श्री श्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.या सांगता सोहळ्याच्या कार्यक्रमाला संघर्षयोद्धा मराठा आरक्षणाचे प्रणेते मा.मनोज जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

# अट्टल महाविद्यालयाचे चार विद्यार्थी भारतीय सैन्यात दाखल



दैनिक वादळ वार्ता
गेवराई/बाळु तोडेकर

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील चार विद्यार्थी भारतीय सैन्यात भरती झाले आहे. त्यापैकी तिघेजण हे एनसीसी छात्र आहेत तर एक विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक आहे. या विद्यार्थ्यांपैकी ५१ महाराष्ट्र बटालियनचा माजी विद्यार्थी कॅडेट वैभव नाटकर आसाम रायफलमध्ये निवडला गेला. तर कॅडेट रोहन गर्जे, कॅडेट ऋषिकेश मुंडे आणि निखिल कांबळे यांची अग्नीवीरमध्ये निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या हस्ते सर्व यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य मेजर डॉ. सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, एनसीसी विभाग प्रमुख डॉ. राहुल माने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण जाधव, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. संदीप वंजारी, सामाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रेवननाथ काळे आदींची उपस्थिती होती.

# ज्ञानदीप विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा.



**किल्लेधारूर/रामदास वाव्हळ**

धारूर शहरातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन प्रा. मधूकर नागरगोजे यांचे हस्ते करण्यात आले, विद्यार्थ्यानी उस्फुर्तपणे सहभाग घेतला होता.

धारूर तालुक्यातील ज्ञानदीप विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतुहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमीत्त भव्यदिव्य अशा विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा. मधूकर नागरगोजे, पालक नेताजी सोळंके, मुख्याध्यापक शेख एस. एस. विज्ञान शिक्षिका मनिषा तिडके , संजय साठे यांच्या हस्ते उद्घाटन करून विज्ञान प्रदर्शनाची सुरुवात करण्यात आली. यावेळी इ. ६ वी व ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर वेगवेगळे प्रयोग बनवले होते. त्या- त्या प्रयोगाविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांनी सांगितली. यावेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक काढून त्यांना प्रशस्ती पत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले , यामध्ये प्रथम क्रमांक कु. समीक्षा सचिन गुन्नाल, द्वितीय क्रमांक कु. जान्हवी अमोल शिंदे,कु. समृध्दी शरद समर्थ,तृतीय क्रमांक कु.भाग्यश्री ग्यानबा शिनगारे,कु. अक्षरा महादेव नांदे या यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वांनी कौतूक केले आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक मुंजाराम निरडे तर आयोजन व मार्गदर्शन विज्ञान शिक्षिका मनिषा तिडके व शिक्षक संजय साठे यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
संपादक ; अजय भांगे मो . ९४२२६६००७७

### धारूर महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेंटची अग्निविर मध्ये निवड

दैनिक वादळ वार्ता किल्ले धारूर/रामदास वाव्हळ धारूर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील श्रीकृष्ण जालिंदर आघाव (गावंदरा), प्रसाद विलास भुजबळ (वडवणी) या एनसीसीच्या दोन कॅडेड्सची निवड अग्निवीर मध्ये झाली आहे. याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना देशसेवा करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी व कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी याकरिता विद्यार्थ्यांना यशस्वी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# दोन समाजात तेढ निर्माण करणा-याला खाकी दाखवा

## मागासवर्गीय अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने पोलीस अधीक्षकांना निवेदन.



**वादळवार्ता/बीड** शहरातील पेठ बीड भागातील रहिवाशी विक्रम बलबीर सौदा या युवकाने सोशल मीडिया फेसबुकच्या माध्यमातून बौद्ध समाज आंबेडकरी समाजाबद्दल महार जातीबद्दल अपशब्द वापरून हे महार जातच संपून टाकली पाहिजे अशा पद्धतीचे भडकाऊ विधान केले होते. त्यामुळे भीम सैनिकाच्या भावना दुखावल्या आहेत. या बाबत पेठ बीड पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून एफ.आय.आर नंबर ००३७ प्रमाणे रितसर गुन्हा दाखल केला आहे मात्र बीड शहरातील सर्व आंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब यांना भेटून आरोपीला अटक करून तत्काळ कारवाई करण्याची मागणी आंबेडकरी समाजाच्या शिष्टमंडळाने केली आहे विक्रम बलबीर सौदा बीड नगरपालिका येथील शासकीय कर्मचारी असून त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्यामुळे त्याचं निलंबन करून सेवेतून बडतर्फ करण्यासंदर्भात बीड नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी निता अंधारे यांना निवेदन दिले यावेळी मागासवर्गीय अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते. प्रेम कांबळे यांच्या तक्रारीवरून पेठ बीड पोलीस स्टेशन या ठिकाणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर साहेब यांना निवेदन देण्यासाठी विविध पक्ष संघटना यांच्यासह बीड शहरातील आंबेडकरी समाजाचे मागासवर्गीय अन्याय अत्याचार विरोधी कृती समितीचे महादेव वाघमारे, केके वडमारे, प्रमोद शिंदे, सनी वाघमारे,भारत कांबळे, पँथर नितीन सोनवणे,प्रेम कांबळे, अक्षय कोकाटे, भैय्या मस्के,गणेश वाघमारे, रजनीकांत वाघमारे,अमर गायकवाड,सागर धन्वे,आकाश जावळे, आकाश कंडरे,प्रतीक वीर, अक्षय तरकसे ,ओव्हाळ सुबोध, ऋषिराज गिरी,विष्णूबाळ झोडगे,अविनाश वडमारे, गायकवाड आकाश अरुण,ए ए.बाळशंकर, अहिरे अमोल,पप्पू वाघमारे,सुमेध वक्ते,मसु जाधव,सूमेध सरवदे,लहू जाधव,सह समाज बांधव उपस्थित होते.

## ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या आव्हानाला प्रतिसाद देवुन भाजपला पराभूत करा-अशोक हिंगे पाटील

### निलंगा येथे वंचित बहूजन आघाडीमध्ये इन्कमिंग सूरू

वादळवार्ता/निलंगा
वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा श्रद्धेय प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला पराभूत करा यासाठी ठिकठिकाणी आव्हान केले आहे.या आव्हानाला प्रतिसाद देत आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला पराभुत करा असे आवाहन मराठवाडा अध्यक्ष तथा लातुर प्रभारी अशोक हिंगे पाटील यांनी निलंगा येथे वंचित बहुजन आघाडी कार्यकर्ता प्रवेश सोहळा व मेळाव्यात अशोक हिंगे पाटील यांनी केले.मार्च एप्रिल मध्ये होत असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्याचे प्रभारी अशोक हिंगे पाटील हे निलंगा येथे पक्षप्रवेश सोहळा व मेळाव्यासाठी आले होते. त्यामध्ये त्यांनी बाळासाहेबांचे हात बळकट करण्याचे आव्हान केले आहे. कुठल्याही परिस्थितीत केंद्रात भाजपचे सरकार स्थापन होऊ द्यायचे नाही ही कार्यकर्त्यांनी मनाशी खुणगाठ बांधावी व कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले. या मेळाव्यात विविध समाजातील अनेक महिला व पुरुषांनी



वंचित मध्ये जाहीर प्रवेश केला. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून कार्यकर्ता मेळाव्याला सुरुवात झाली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, त्यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड लातूर जिल्हाध्यक्ष सय्यद सलीम,जिल्हा महासचिव ॲड.रोहीत सोमवंशी,जिल्हा उपाध्यक्ष शेख हमीद,युवक जिल्हाध्यक्ष युवराज जोगी, महासचिव नितीन गायकवाड लातुर तालुकाध्यक्ष सुनील कांबळे, लातुर शहराध्यक्ष सचीन गायकवाड निलंगा तालुका अध्यक्ष तथा आयोजक सुनील सूर्यवंशी, यांनी कार्यक्रमाची प्रस्तावित केले.नितीन सुरवसे,निलंगा महिला तालुकाध्यक्षा वंदनाताई सूर्यवंशी, शहराध्यक्षा सुनीता लोकरेताई यांच्यासह पदाधिकारी आयुब खुरेशी,सचिन गायकवाड सय्यद अन्वर,हरिदास साळुंखे,अंकुश कांबळे सह मेळाव्याला शहर व ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न...

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे



कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिना निमित्त ज.ए.इ.इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा उरण येथील शाळेतील मुलांनी विविध कार्यक्रम सादर करून मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा केला.या गौरव दिनाचे उद्घाटन उरण तालुका कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून आणि दीपप्रज्वलन करून केले. या वेळेस एन. आय. हायस्कूल चे प्राचार्य एल .एम. भोये,मुख्याध्यापिका ज्योती पाटील,शिक्षकवृंद मोहिनी पाटील, क्षमा थळी,विद्या पाटील,मिनाक्षी पोखरकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकात विद्या पाटील मॅडमने कविवर्य कुसुमाग्रज यांचा परिचय व मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व सांगितले तर या गौरव दिनानिमित्त शाळेतील मुलांनी मराठी भाषेतील विविध साहित्य प्रकारांना स्पर्श करणा-या आपल्या कला सादर केल्या. या मध्ये अभंग, बालगीत, नाट्यछटा,पोवाडा,बहिणाबाईंच्या कविता,कुसुमाग्रजांच्या कविता,कथा कथन ,समूहगीत,मराठी भाषा अभिमान गीत आदी प्रकार सादर करून कार्यक्रमाला रंगत आणली. या वेळी उरण कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी आपल्या बालकविता सादर करून मुलांचे मनोरंजन केले. मराठी भाषा ही आपल्या आईची भाषा आहे,आपल्या गावाची भाषा आहे.ती आपली अस्मिता आहे,तीचा गोडवा टिकवण्यासाठी मराठी भाषेतील कथा, कविता,नाट्यछटा मुलांनी वाचायला हव्या असे अवाहन देखील केले.इंग्रजी माध्यमाची शाळा असून देखील मोठ्या उत्साहात मराठी भाषा गौरव दिन साजरा केल्या बद्दल आयोजकांचे व सहभागी विद्यार्थ्यांचे मच्छिंद्र म्हात्रे यांनी कौतुक देखील केले. या वेळेस मराठी भाषेचे वाचन व्हावे म्हणून जागर तंबाखूमूक्तीचा आणि रोज भेटावी रम्य सकाळ ही पुरवणी काव्य संग्रहाची भेट सुध्दा शाळेस देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी भाषेचा गोडवा वाढवणारी उदाहरणे देऊन व काव्यपंक्ती वापरून सुरेख पणे मोहीनी पाटील यांनी केले.आभार प्रदर्शनाचे काम मीनाक्षी पोखरकर यांनी केले.

## बीडमध्ये पुरवठा निरीक्षक पदाचा पेपर फुटला !

### पेपर फुटी मागे बीडची मोठी टोळी, त्यांच्या मागे कोणाची सत्ता पोलिसांनी शोधावे

**अन्यथा सेना स्टाईल आंदोलन केले जाईल - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर**

वादळवार्ता/बीड
बीड येथील नगर रोडवर चऱ्हाटा फाटा येथील स्वामी विवेकानंद कॉम्प्युटर्स या परीक्षा सेंटरवर पुरवठा निरीक्षक पदाचा पेपर फोडणारा सराईत गुन्हेगार रंगेहात अटक झाला आहे.या आरोपीवर यापूर्वी पेपर फोडीचे अनेक गुन्हे दाखल असताना तो पुन्हा या परीक्षेला कसा बसला ? या पेपर फुटी मागे बीड मधील एक मोठी टोळी कार्यरत असून त्यांच्या मागे कोणाच्या सत्तेची ताकद आहे हे उघड झाले पाहिजे. या प्रकरणातील खऱ्या गुन्हेगारांवर पोलिसांनी कारवाई करून अटक करावी आणि अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन केले जाईल, असा निर्वाणीचा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी दिला आहे.



बीड येथील स्वामी विवेकानंद कॉम्प्युटर्स चराटा फाटा नगर रोड बीड या परीक्षा सेंटरवर बुधवार दिनांक 28 फेब्रुवारी 2024 रोजी पुरवठा निरीक्षक पदाची परीक्षा होती.या परीक्षा सेंटरवर पुरवठा निरीक्षक पदाचा पेपर सोडवणाऱ्या परीक्षार्थी लहू मच्छिंद्र काळे याने बटन गुंडी कॅमेरा द्वारे पेपर फोडला. अत्याधुनिक यंत्राचा वापर करून पेपर बाहेर गेला. बाहेर त्या विषयाचे तज्ञ शिक्षक तयारच बसलेले होते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर या विद्यार्थ्याला अत्याधुनिक साहित्याद्वारे भ्रमणध्वनीवरून कानी पडत होते. कानाच्या आत अगदी बारीक सुपारी पेक्षाही लहान हेडफोन बसवलेला होता. तो हेडफोन आहे असे कोणाच्याही लक्षात येत नाही. त्याचा आवाज सुद्धा बाहेर येत नाही. मात्र ऐकणाऱ्याला ऐकू येते. त्याची रिंग वाजत नाही. शांत ऐकून विद्यार्थी प्रश्नांची उत्तरे लिहीत होता. मात्र त्याच्या हालचालीवरून परीक्षा सेंटर वरील परीक्षकाला शंका आल्याने त्याने कसून तपास केला असता त्याच्याकडे अत्याधुनिक साहित्य सापडले. एवढेच नव्हे तर त्याने पेपर हॉलमधून बाहेर पाठवल्याचेही स्पष्ट झाले. त्यामुळे त्याला तात्काळ बाजूला घेण्यात आले. पोलिसांना बोलवण्यात आले. घटना सकाळी घडली मात्र रात्री उशिरापर्यंत त्या विद्यार्थ्यावर बीड ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला जाऊ नये म्हणून बीड मधील एक मोठी टोळी क्रियाशील होती. ही बाब जेव्हा शिवसेनेला कळाली तेव्हा शिवसेनेने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. आणि ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक यांना घटनेचे गांभीर्य सांगून या घटनेतील आरोपींना माफ करू नका, ज्याने पेपर फोडला आहे त्याच्यावर तर गुन्हा दाखल करून अटक केलीच पाहिजे. मात्र त्यांच्या मागे असणारे खरे गुन्हेगार देखील पोलिसांनी समोर आणले पाहिजेत. अन्यथा शिवसेना स्टाईलने आम्ही या प्रकरणाचा छडा लावू असा निर्वाणीचा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी दिला आहे.

### राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त अट्टल महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन स्पर्धा संपन्न...

वादळवार्ता/गेवराई
राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त अट्टल महाविद्यालयात दि. २८ फेब्रुवारी रोजी पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४० स्पर्धक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शनात सादरीकरण केले.



प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पोस्टरमध्ये ग्लोबल वार्मिंग अँड क्लायमेट चेंज, आर्टिफिशल इंटेलिजन्स, अप्लाय मॅथेमॅटिक्स व अप्लाईड फिजिक्स इत्यादी विषयांचे सादरीकरण केले गेले. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या प्रदर्शनाचे संयोजन वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. मधुकर वाडीकर यांनी केले. डॉ. वर्षा जयसिंगपुरे, डॉ. सुदर्शना बढे, प्रा. ए. पी. जानवळे, डॉ. समाधान इंगळे, डॉ. संदीप बनसोडे, प्रा. शरद सदाफुले, प्रा. अरुण जाधव यांची उपस्थिती होती. परीक्षक म्हणून डॉ. वृषाली गव्हाणे, डॉ. मीना नागवंशी यांनी काम पाहिले.

### मस्साजोग येथे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे यांचा वंचित पदाधिकाऱ्यांकडून सत्कार




वादळवार्ता/बीड मस्साजोग ता.केज येथे वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष यांचा लिंबराज गायकवाड व सहकारी यांनी केला सत्कार. मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील सध्या जिल्ह्यातील विविध तालुक्याचे दौऱ्यावर फिरत असून पक्ष संघटना बांधणी, शाखा उद्घाटन संपर्क अभियान हाती घेतले आहे. त्या पार्श्वभूमीवर ते तालुका केज येथील मस्साजोग गावात आले होते. त्यांचा स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांजरा नदीवरील जुना पूल व रस्ता दुरुस्तीचे काम दोन दिवसात सुरु करण्याचे अल्टीमेटम

## आमदार नमिता मुंदडा यांच्या मागणी नंतर मेगा कंपनीला आदेश

### अनेक वर्षां पासून रस्ता दुरुस्त न करणाऱ्या मेगाला दंड ठोकून कारवाई करायला हवी

### प्रसिद्धी माध्यमांमुळेही बदनामी होत असल्याचा केला उल्लेख!

**दैनिक वादळ वार्ता केज/गौतम बचुटे**
गेली अनेक वर्ष पासून केज-कळंब दरम्यानच्या मांजरा नदीच्या पुलाचे काम सुरू असताना ते अद्यापही पूर्ण झाले नसल्याने या रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशी व वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत असताना सरकारला न जुमानता या महामार्गाचे काम करीत असलेली मेगा कंपनीने जुना रस्ता दुरुस्त न करता अनेकांची गैरसोय केली. त्या बद्दल केज अंबाजोगाई मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी तक्रार केल्या नंतर महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने जुना पूल रस्ता आणि ॲप्रोचेस तात्काळ दुरुस्त करून देण्याचे आदेश मेगा कंपनीला दिले आहेत. खामगाव-सांगोला महामार्ग क्र ५४८-सी या वरील केज ते कुसळंब दरम्यान आणि केज-कळंब रस्त्यावरच्या मांगवडगाव फाट्या जवळच्या मांजरा नदीवरील नवीन पुलाचे रस्त्याचे सुमारे दोन ते अडीच की मी रस्त्याचे व नवीन पुलाचे काम सुमारे पाच वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासून रखडलेले आहे. हा रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरित झालेला आहे. या टप्प्या दरम्यानचे पुलाचे व रस्त्याचे काम हे मेगा इंजिनियरिंग व इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी



लिमिटेड करीत आहे. परंतु नवीन पुलाचे व रस्त्याचे काम पूर्ण होई पर्यंत या कंपनीने पर्यायी रस्ता म्हणजेच सध्या वापरात असलेला जुना पूल आणि त्यावरील दोन्ही बाजूचा रस्ता याची देखभाल व दुरुस्ती केलेली नसल्याने या ठिकाणी अनेक अपघातात व चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. त्या बाबत प्रसिद्धी माद्यमातून अनेक वेळा आवाज उठविला आहे. तसेच केज विकास संघर्ष समितीने ही अनेक आंदोलने केली आहेत. परंतु मेगा कंपणी किंवा प्रशासनाने त्याची दखल न घेता थातुरमातुर स्वरूपाचे काम करीत होते. दरम्यान केज अंबाजोगाई मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनीही वरिष्ठ पातळी वरून या गैरसोयीची दखल घेत अधीक्षक अभियंत्यांना तक्रार करीत पत्र देताच त्यांनी काम करणाऱ्या मेगा कंपनीला पत्र देऊन नवीन पूल आणि त्याच्या ॲप्रोचेस काम पूर्ण होई पर्यंत जुन्या पुलाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूचा रस्ता आणि ॲप्रोचेसचे काम तात्काळ दोन दिवसांत सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच काम सुरू झाल्याचे फोटो देखील वरिष्ठांना पाठविण्याचे म्हटले आहे.

**रस्ते विकास महामंडळाने घेतली बातम्यांचीही दखल :-** मेगा कंपनीला रस्ता दुरुस्ती संदर्भात दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, रस्त्यामुळे गैरसोयी संबंधीच्या प्रकाशित झालेल्या बातम्यांमुळे रस्ते विकास महामंडळ यांची बदनामी होत आहे असा उल्लेखही पत्रात केला आहे.

**रखडलेल्या कामाला जबाबदार असलेल्या मेगा कंपनीवर कारवाई हवी !:-** गेल्या अनेक वर्षा पासून काम पूर्ण न करू शकलेल्या मेगा कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

**अनेक ठिकाणी कामे अपूर्ण :-** साळेगाव येथेही संरक्षक जाळी, नाली, फुटपाथ, पिक-अप प्रवाशी शेड आणि डिव्हायडर वरील पथदिवे यांचे काम अपूर्ण असून ते पूर्ण करण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिझाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )